# वीरा'ज् निसर्ग रक्षक व रिसर्च फाउंडेशन

## (Veera's Nisarg Rakshak And Research Foundation)

CIN: **U88900PN2025NPL240790**

Letter No: 2025_26/0016 Date: 02/09/2025

**प्रति,**

अध्यक्ष व कार्यकारिणी मंडळ,
(सर्व) गणेशोत्सव मंडळ/(सर्व )दुर्गामाता उत्सव समिती,
सर्व जिल्हे, महाराष्ट्र

**विषय:** उत्सव खर्चातून १०% ते १५% पर्यावरण संरक्षणासाठी देणगी/विनियोग करण्याबाबत विनंती.

महोदय,

आपल्या मंडळाकडून दरवर्षी मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने गणेशोत्सव/ दुर्गामाता उत्सव साजरा केला जातो. समाजातील एक जबाबदार घटक म्हणून, आपल्या कार्यातून सांस्कृतिक तसेच सामाजिक उपक्रमांमध्ये मोठे योगदान दिले जाते, ही अत्यंत आनंदाची बाब आहे.

सद्यस्थितीत वाढत्या प्रदूषण व हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संरक्षणाची आवश्यकता अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. म्हणूनच, आपल्या मंडळाने या वर्षीच्या उत्सव खर्चापैकी किमान **१०% ते १५% निधी** पर्यावरण संवर्धनाच्या कार्यासाठी (झाडे लावणे, नदी व तळ्यांची स्वच्छता, प्लास्टिकमुक्त उपक्रम, पाण्याचे संवर्धन इ.) वापरण्याचा निर्णय घ्यावा, अशी विनंती आहे.

आपल्या मंडळाकडून मिळालेला हा निधी थेट पर्यावरण संरक्षणासाठी खर्च होईल आणि आपल्या नावाने ही कार्ये पार पाडली जातील. यामुळे समाजात एक सकारात्मक संदेश जाईल आणि भविष्यातील पिढ्यांसाठी आपण स्वच्छ, हिरवे व निरोगी वातावरण निर्माण करण्यास हातभार लावू.

आमच्या कार्याबद्दल अधिक माहितीसाठी कृपया www.nisargrakshak.org या संकेतस्थळावर भेट द्या किंवा खालील QR कोड स्कॅन करा. आपण या सामाजिक उपक्रमात सहकार्य कराल, असा आम्हाला विश्वास आहे.

धन्यवाद.

आपला नम्र,

डॉ. समीर जाधव
संचालक
+91-8446414658

Veera's Nisarg Rakshak And Research Foundation, 01, First Floor, Datta Vihar Appt, Near Datta Mandir (Trimurti Vihar), Oppo. Bhekrai PMT Bus Stop, Saswad Road, Phursungi, Pune. 412308. Maharashtra (BHARAT)
Mobile: +91-8446414658, Office: +91-22-69718824, mail: save@nisargrakshak.org, Web: www.nisargrakshak.org